Estd. 1962
'A++' Accredited by
NAAC(2021) with
CGPA3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बेटी बचाओ अभियान

## अंतर्गत

### राष्ट्रीय बालिका दिना निमित्त

### दि. 10 फेब्रुवारी, 2023 रोजी

### शिवाजी विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी

## पथनाटय स्पर्धा

लिंग–गुणोत्तरातील तफावत कमी करण्यासाठी शासन, अशासकीय संघटना आणि शिक्षण संस्थाकडून अनेक पावले उचलली गेली आहेत. शिवाजी विद्यापीठातून सर्वप्रथम हा प्रयत्न करण्यात आला. हे अभियान आता विद्यापीठ आणि कॉलेज स्तरावर राबविले जात आहे. या अभियाना अंतर्गत वेगवेगळे उपक्रम राबविले जात आहेत, सदर अभियाना अंतर्गत 2022–23 साली विद्यार्थ्यांमध्ये जाणीव जागृती होण्यासाठी राष्टीय बालिका दिनाचे अवचित्य साधून शिवाजी विद्यापीठातील अधिविभाग व संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी भव्य पथनाट्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धेची माहीती खालीलप्रमाणे

**स्पर्धेचे विषय:–** 1) स्त्री भ्रुणहत्या 2) स्त्री शिक्षण 3) स्त्री सबलीकरण 4) स्त्रियांचा समाजातील दर्जा

**गुगल फॉर्म लिंक:–** https://forms.gle/kfhZDbusJbRNiHB5A

| कमांक | परितोषिक रक्कम |
|---|---|
| प्रथम कमांक | रू. 5,000 व स्मृतिचिन्ह |
| व्दितीय कमांक | रू. 3,000 व स्मृतिचिन्ह |
| तृतीय कमांक | रू. 2,000 व स्मृतिचिन्ह |
| उत्तेजनार्थ | रू.1,000 व स्मृतिचिन्ह |

**स्पर्धेचे नियम :–**

1) नाव नोंदणीसाठी अंतिम तारीख 09 फेब्रुवारी, 2023 ही राहील आणि नाव नोंदणीसाठी गुगल फॉम भरणे अनिवार्य आहे.
2) शिवाजी विद्यापीठ अधिविभागातील व विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थी भाग घेऊ शकतात.
3) आपली प्रवेशिका अधिविभाग/महाविद्यालय मार्फत जमा करण्यात यावी. अधिविभागाचे/महाविद्यालयाचे पत्र विद्यार्थ्यांच्या नावासहीत असावे.
4) पथनाट्यसाठी कमीत कमी 20 मिनिटे जास्तीजास्त 30 मिनिटे वेळ दिला जाईल.
5) जास्तीजास्त 15 विद्यार्थी तर कमीत कमी 10 विद्यार्थ्यांचा समुह
6) स्पर्धेत तीन कमांक व एक उत्तेजनार्थ काढण्यात येईल व सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल.
7) पारितोषिक वितरण व सहभाग प्रमाणपत्र दि. 8 मार्च, 2023 रोजी देण्यात येतील आणि 8 मार्च पुर्वी निकाल शिवाजी विद्यापीठाच्या वेबसाईटवर प्रदर्शित केला जाईल
8) पथनाटय संघाचा कोणताही खर्च करण्यात येणार नाही
9) पथनाटयच्या बेस्ट स्क्रीप्टसाठी स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येईल
10) परिक्षकांचा निर्णय अंतिम असेल.
11) स्पर्धेचे ठिकाण राजमाता जिजाऊ बहुउद्देशीय सभागृह, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**संयोजक**

**डॉ. प्रतिभा बी. देसाई,**
समन्वयिका,
बेटी बचाओ अभियान
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02312609429, 9822765248

**डॉ. पी. टी. गायकवाड**
प्र. संचालक
विद्यार्थी विकास विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर